**नियमित फौजदारी खटल-१०१/२०२५**

**नि.१४/क., महा.सरकार /आकाश भोसले**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ यांची जबानी.

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नांव – सुरज अरुण धमोणे

वय - ३५

धंदा - व्यवसाय,

राहणार - ई वॉर्ड, भगतसिंग गल्ली, दौलतनगर कोल्हापूर

<u>**सरतपास सरकार तर्फे सरकारी वकील श्रीमती एस.ए.ठोकळ**</u>

आमचे मध्यवर्ती बस स्थानक येथे ए-वन दम बिर्यानी नावाचे दुकान आहे. दुकानाची वेळ दु.४.०० ते रा.११.०० अशी आहे. आरोपी माझा मित्र आहे. माझ्या दुकानावर बाहेरील लोकांची भांडणे झाली होती. त्या भांडणामध्ये नेमके काय झाले हे मला माहिती नाही. आरोपी दमदाटी करुन पैसे न देता माझ्या दुकानातून बिर्यानी सतत घेऊन जात होता असे घडले नाही. दि.०३/०१/२०२४ रोजी आरोपी रा.९.०० वा माझ्या दुकानावर आला आणि बिर्यानीचे पैसे मागीतले असता त्यांने मला शिवीगाळ केली तसेच धमकी दिली असे काही घडले नाही. मला आता दि.०६/०१/२०२४ रोजीची सदर फिर्याद दाखविण्यात आला. सदर फिर्यादीमधील मजकूराबाबत माहिती नाही. सदर फिर्यादीवर असलेली सही ही माझी आहे. सदर फिर्यादीस सही ओळखणेपुरते <u>**नि.१५**</u> आहे. आता मला दि.०६/०१/२०२४ चा पुरवणी जबाब दाखविण्यात आला त्यावर माझी सही परंतू त्यातील मजकूराविषयी मला सांगता येत नाही.

२. फौ.प्र.सं.क १६४ प्रमाणे जबाबाचे सिलबंद पाकीट अभिलेखावर दाखल केलेले आहे. सदरचे पाकीट सरकारी वकीलांनी आरोपीचे वकीलांचे समक्ष व फिर्यादीसमक्ष उघडले सदरच्या पाकीटाला <u>**नि.१६**</u> देण्यात आला. सदरचा फिर्यादीचा जबाब फिर्यादीस दाखविण्यात आला. न्यायालयात माझा जबाब घेण्यात आला. सदरच्या जबाबावर माझी

सही आहे.  सदरच्या जबाबामध्ये मी काय सांगीतले होते हे मला आता आठवत नाही. सही ओळखलेमुळे सही **<u>नि.१७</u>** देण्यात येते.

(प्रस्तुत फिर्यादीने फिर्याद दिलेचे मान्य करुन तिच्यावर आपली सही ओळखली आहे. परंतू ती घटनेबाबत  तसेच फिर्यादीमधील मजकूराबाबत माहिती नाही असे सांगत आहे. म्हणून सरकारी वकीलांनी सत्य वस्तुस्थिती न्यायालयासमोर येणेसाठी तिचा उलटतपास घेणेची परवानगी मागीतली. एकंदरी हकीकतीचा विचार करता, भारतीय साक्ष अधिनियम कलम १५७ प्रमाणे साक्षीदाराचा उलटपास घेण्यास अभियोग पक्षास परवानगी मंजूर करण्यात येत आहे.)

<u>सरकारी पक्षातर्फे उलटतपास</u>

२.  हे म्हणणे खरे नाही की, दि.०३/०१/२०२४ रोजी रा.९.०० वा. आरोपीने दमदाटी रु.२५० रु किंमतीची बिर्याणी व मासे खाऊन पैसे न देता निघुन जाऊ लागला त्यावेळी त्याच्याकडे पैसाची मागणी केली असता त्याने ये लवडया मी कोण आहे तुला माहिती नाही का, मी भाई आहे तु पैसे मागीतले तर याद राख तुझा गाडा फोडून टाकीन, राजारामपूरीतील बेकरीवाल्यासारखी तुझे हात माय मोडून तुला मारीण अशी धमकी देऊन पैसे न देता निघुन गेला.

३.  हे म्हणणे खरे आहे की, आरोपीची व माझी न्यायालयाबाहेर तडजोड झालेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे आरोपीविरुध्द माझी कोणतीही तक्रार नाही.  मला खटला पुढे चालवावयाचा नाही तसेच इतर साक्षीदार तपासवायाचे नाही.

४.  हे म्हणणे खरे नाही की, माझ्या फिर्यादीतील आधोरेकित भाग अ मधील मजकूर मी पोलिसांना सांगीतला होता. माझ्या फिर्यादीतील आधोरेकित भाग अ मध्ये काय लिहिलेला आहे, याचे कारण मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की,  सदरच्या आधोरेकित भाग अ प्रमाणे मी पोलिसांना सांगीतलेमुळे तसा मजकूर माझ्या जबाबात लिहिलेला आहे.

आरोपीतर्फे विधिज्ञ एस.आर.गणेशाचार्य यांचे मार्फत सुरु...

५. नाकारला.

६. फेरतपास नाही.

जबाब माझ्या समक्ष नोंदविला.

**श्रवणोत्तर स्वीकृत,**

**सही/-**
**(श्रीमती एम. डी. कश्यप)**
**मुख्य न्यायदंडाधिकारी, कोल्हापूर**

**दिनांक-१४/०७/२०२६**

**नियमित फौजदारी खटल-        /**

**नि.      /क, महा.सरकार /**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.      यांची जबानी.

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नांव –

वय -

धंदा -

राहणार -

<u>सरतपास सरकार तर्फे सरकारी वकील श्री.ए.एन.डोईफोडे</u>

<u>आरोपीतर्फे लोकाभिरक्षक ए.टी. देसाई यांचे मार्फत सुरु...</u>

८. फेरतपास नाही.

जबाब माझ्या समक्ष नोंदविला.

श्रवणोत्तर स्वीकृत,

**(श्रीमती एम. डी. कश्यप)**

**दिनांक-०९/०७/२०२६**

**मुख्य न्यायदंडाधिकारी, कोल्हापूर**